# GREENLAWNS HIGH SCHOOL
## TERMINAL EXAMINATION 2019-20

**SUBJECT : MARATHI** | **CLASS : VII**
**TIME : 2 HOURS** | **MARKS : 80**

---

सूचना :- १) विभाग 'अ' मधील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहा:-

२) विभाग 'ब' मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा:

प्रश्न १. अ) रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द लिहा:- (४)

१) उन्हाळयात गडावर वाळलेला ———————————— दिसतो.
२) काही लोक ———————————— होते.
३) त्या —————————— नाचातून मी चाललो होतो.
४) पक्ष्यांचे फोटो काढण्यापूर्वी —————————— पूर्वपरवानगी घ्यावी लागते.

आ) असे कोण, कोणास म्हणाले ते लिहा. (४)

१) "मी सांगेन घरात जा घेऊन."
२) "माणसं असो का जनावर त्यांना वाचवलंच पाहिजे ना!"
३) " या प्रेमावर कोणाची दृष्टी नको पडायला."
४) "मी काही घाबरत नाही."

इ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा:- (४)

१) श्यामने नवीन कोट शिवण्यासाठी काय केले ?
२) शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफित कोणातर्फे दाखवण्यात आली ?
३) मुलाच्या दादा व ताईला कोणता आजार व्हायचा ?
४) आग वेळेवर विझली नसती तर कोणते नुकसान झाले असते ?

प्रश्न २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा:- (९)

१) श्यामने आणलेला नवीन कोट पाहून आईवडिलांच्या मनात कोणते प्रश्न निर्माण झाले ?
२) गाई वासरे घेऊन आलेल्या गुराख्याला गहिवरुन का आले ?
३) सरांनी पक्ष्यांबद्दल सांगितलेली कोणती गोष्ट पटली ?
४) दवाखान्यातील लोकांकडे पाहून लेखकाला हेवा का वाटला ?

..२/-

प्रश्न ३. क) एका वाक्यात उत्तरे लिहा:- (२)

१) रानमेवा कुठे उगवला आहे ?

२) मुलांचा गाण्यातून काय-काय फुलते ?

ख) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा:- (६)

१) काळ्याशार मातीतून काय मिळते असे कवी म्हणतात ?

२) कवितेत आलेले निसर्गाचे घटक कोणते ?,

प्रश्न ४. खालील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा:- (८)

१) माझा विमान प्रवास
२) सातवीतील पहिला दिवस
३) माझा आवडता छंद
४) शिक्षणाचे महत्त्व

प्रश्न ५. खालील दिलेल्या विषयावर पत्रलेखन करा:- (५)

शाळेजवळील अस्वच्छ कचरापेटीबाबत तक्रार करणारे पत्र नगरपालिकेच्या अधिकाऱ्याकडे पाठवा:

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा:- (५)

विनयशीलतेला साजेसा साधेपणा शास्त्रीजींच्या वागण्यात होता. 'त्यांनी स्वत:साठी दोन सदरे, दोन धोतर आणि एक टोपी याशिवाय जास्त कपडे कधीच वापरले नाहीत.' अशी त्यांच्या भगिनीने आठवण सांगितली आहे. हे सर्व कपडे खादीचे असत. सोळा ते अठरा तास ते काम करीत, कामात कितीही व्यग्र असते तरी ठरलेली कामे त्यांच्या लक्षात असत. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत होता. एकदा जेव्हा शपथविधीला जायचे होते. तेव्हा शास्त्रीजी शांतपणे कामकाज पहात होते. शास्त्रीजींच्या लक्षात आहे की नाही अशी शंका वाटून बिचाऱ्या सेक्रेटरीची मात्र सारखी चुळबूळ चालली होती. शांत स्वभावाच्या शास्त्रीजींच्या चेहऱ्यावर मात्र अजिबात काही भावदर्शन नव्हते. ठरलेली वेळ होताच हातातले काम एखादया यंत्राप्रमाणे थांबले. शास्त्रीजी जागचे उठले, बाहेर पडले आणि राष्ट्रपती भवनाकडे चालत निघाले शपथविधीसाठी! असे शांत आणि वक्तशीर वागणारे शास्त्रीजी होते.

प्रश्न:-

१) शास्त्रीजीकडे कोणत्या प्रकारचे व कोणते कपडे होते ? (२)

२) शपथविधीला जाण्याआधी सेक्रेटरी अस्वस्थ का होता ? (२)

३) शास्त्रीजीची स्वभाव वैशिष्ट लिहा ? (१)

नाव :———————————————————— हजेरी क्र. ——————————

## विभाग 'ब'

**सूचना :- खालील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेवर सोडलेल्या जागी लिहा**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा:- (६)

१) सुचेनासे होणे- ____________________

२) दृष्टी पडणे – ____________________

३) सादर करणे – ____________________

४) गुजराण करणे – ____________________

प्रश्न २. च) खालील वाक्यातील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा:- (३)

१) गुलमोहराची पाने सुंदर असतात

____________________

२) घरात धान्यांच्या राशी होत्या.

____________________

छ) खालील वाक्यातील सर्वनामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा:- (३)

१) जो कष्ट करतो तो सफल होतो.

____________________

२) त्या पिशवीत काय आहे ?

____________________

३) आमचा निर्णय नंतर कळवू.

____________________

ज)खालील वाक्यातील विशेषणे ओळखून त्यांचे प्रकार लिहा:- (३)

१) रामू दोन किलो तांदूळ आण.

____________________

२) ती मूले मैदानात खेळतात.

____________________

३) आईने कारल्याची कडू भाजी केली.

____________________

प्रश्न ७. खालील जाहिरात वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

।।त्यागाने पापाचे मुददल फिटते, दानाने पापाचे व्याज चुकते।।

**दानात दान रक्तदान, श्रेष्ठ दान रक्तदान**

**सुभाषचंद्र बोस यांच्या पुण्यतिथी निमित्त सुभाष मित्रमंडळाने यंदा या महिन्याच्या दिनांक २७ ते ३१ पर्यंत पाच दिवसांच्या रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.**

**सर्व नागरिकांना रक्तदानाचे व सहकार्याचे विनम्र आव्हान.**

आपल्या रक्ताचा एक थेंब, अनमोल जीवाचे करी रक्षण.

ही एक प्रकारची समाज सेवेची उत्तम संधी आहे.

**त्वरा करा ! त्वरा करा!!**

**स्थळ : रामकृष्ण परमहंस विद्यालय, दवारकामाई नगर, ठाणे (प.),**

**वेळ : सकाळी ९ ते ११ व दुपरी ४ ते ७**

विशेष : प्रत्येक रक्तदात्यास रक्तदानानंतर चहा, नाष्टा व सुभाषचंद्र बोस यांचे आकर्षक छायाचित्र भेट मिळेल.

**सर्वांनी सहकार्य करावे ही आग्रहाची विनंती.**

प्रश्न:-

१) रक्तदान शिबिराच्या आयोजनाचे निमित्त कोणते होते? (१)

२) रक्तदाना नंतर रक्तदात्यांस कोणता लाभ मिळणार होता? (१)

३) श्रेष्ठ दान कोणते? (१)

४) लोकांना कोणती उत्तम संधी मिळणार होती? (१)

५) जाहिरातीतील यमक जुळवणारे शब्द? (१)

६) रक्तदानाचे स्थळ कोणते? (१)

प्रश्न ३. खालील वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार ओळखा. (४)

१) आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे.

______________________

२) आई आणि बाबा कामावर गेले.

______________________

३) शाब्बास! चांगले काम केलेस बाळा!

______________________

४) सगळीकडे हिरवेगार गवत उगवले होते.

______________________

प्रश्न ४.ट) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा:- (२)

१) स्मृती - ____________ २) गाठोडे - ____________

३) उर्जा - ____________ ४) फांदी - ____________

ठ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा:- (२)

१) थोरला भाऊ शहरात काम करत होता.

______________________

२) घरात आजी पौराणिक कथा वाचत बसली होती.

______________________

ड) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदला:- (२)

१) शाळेत प्रदूषण संबंधी चित्रफित दाखवली.

______________________

२) माझ्या मनात आईबाबांची आठवण दाटून आली.

______________________

ढ) खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा:- (२)

१) गृहस्थ - ____________ २) ताई - ____________

३) शिंपी - ____________ ४) माय - ____________